पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भूमि आणि जिंदगी विभाग
जाहीर प्रकटन

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हॉकर्स/फेरीवाले यांचे सन २०१२-१४ मध्ये सर्व्हेक्षण करण्यात आलेले होते. त्यामध्ये पात्र हॉकर्स / फेरीवाले यांचे बायोमेट्रीक नोंदणी करुन प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही अंशत: करणेत आलेली आहे. या सर्व्हेक्षणात अद्यापही काही पात्र फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. अशा उर्वरीत पात्र हॉकर्स / फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक नोंदणी करण्याची कार्यवाही मनपाचे आठही क्षेत्रिय कार्यालयांमध्ये दिनांक १७/०९/२०१८ ते २९/०९/२०१८ या कालावधीत करण्याचे नियोजित आहे. तरी सर्व पात्र हॉकर्स/फेरीवाले यांनी दि १७/०९/२०१८ ते २९/०९/२०१८ या कालावधीत आपल्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयामध्ये आवश्यक कागदपत्रे व आधारकार्ड पुराव्यासह सकाळी १० ते सायं ५.४५ या कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) उपस्थित राहून बायोमेट्रीक नोंदणी करुन घ्यावी. सदर कालावधीमध्ये बायोमेट्रीक नोंदणी करुन न घेणाऱ्या हॉकर्स/फेरीवाल्यांची तदनंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

क्र. भूजि/९/कावि/३६५/२०१८
दिनांक -१४/०९/२०१८